दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २८८ | पाने - ४



### आजचे पंचांग

दिनांक : १७ जुलै २०२६ वार : शुक्रवार माह (अमावस्यांत) : आषाढ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : तृतीया तिथी (सकाळी ०६:२७ पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी नक्षत्र : मघा नक्षत्र (सायंकाळी ०६:३४ पर्यंत) त्यानंतर पूर्वा फाल्गुनी नक्षत्र योग : व्यातीपात योग (रात्री १०:४५ पर्यंत) त्यानंतर वरीयान योग करण : गराजा करण (सकाळी ०६:२७ पर्यंत)

### भेटींना राजकीय रंग देऊ नका

**पुणे :** महायुतीतील घटक पक्षांचे नेते मुख्यमंत्री किंवा उपमुख्यमंत्र्यांना भेटणे ही सामान्य बाब आहे. अशा भेटींसाठी पक्ष नेतृत्वाला पूर्वकल्पना देण्याची आवश्यकता नसून, आमचा पक्ष भक्कम आहे. त्यामुळे या भेटींचा राजकीय अर्थ काढू नये, असे कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी स्पष्ट केले. नाबार्डच्या ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर भरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

# ‘प्रेस स्वातंत्र्य’ की बेजबाबदार स्वैराचार?

## दिल्ली उच्च न्यायालयाचा इशारा; माध्यम नियमनावर सरकार किती गंभीर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । विशेष विश्लेषण**

प्रेस स्वातंत्र्य हे लोकशाहीचे चौथे स्तंभ मानले जाते. परंतु हे स्वातंत्र्य कोणावरही तथ्यहीन आरोप करण्यासाठी, सनसनाटीपणा निर्माण करण्यासाठी किंवा वैयक्तिक प्रतिष्ठेवर आघात करण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही, असे स्पष्ट आणि महत्त्वपूर्ण निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. विशेषतः डिजिटल माध्यमांच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर स्वयंघोषित पत्रकारांकडून होत असलेल्या बेजबाबदार पत्रकारितेबाबत न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त करत संसदेने माध्यम नियमनासाठी स्पष्ट कायदेशीर चौकट तयार करण्याचा विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, भारतीय संविधानाने दिलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य हे लोकशाहीचे मूलभूत मूल्य असले, तरी ते अमर्याद नाही. या स्वातंत्र्याचा वापर नागरिकांच्या प्रतिष्ठेवर, गोपनीयतेवर किंवा न्यायप्रक्रियेवर परिणाम करणाऱ्या पद्धतीने होऊ नये, ही राज्याची आणि समाजाचीही जबाबदारी आहे.

न्यायालयाने विशेषतः अशा व्यक्तींवर भाष्य केले, जे कोणतेही पत्रकारितेचे प्रशिक्षण, संपादकीय जबाबदारी किंवा आचारसंहिता न पाळता केवळ स्मार्टफोन आणि मायक्रोफोनच्या आधारे स्वतःला पत्रकार म्हणून सादर करतात. सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अशा व्यक्तींकडून अप्रमाणित माहिती, दिशाभूल करणारे दावे आणि वैयक्तिक बदनामीचे प्रकार वाढत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.




मात्र या निरीक्षणामुळे एक मोठा सार्वजनिक प्रश्नही समोर येतो. देशात डिजिटल माध्यमांचा झपाट्याने विस्तार होत असताना सरकारने आजवर विश्वासार्ह डिजिटल पत्रकारिता, जबाबदारी, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व यासाठी सर्वमान्य आणि संतुलित धोरण का विकसित केले नाही? एकीकडे खोटी माहिती, ट्रोलिंग आणि बनावट पत्रकारितेच्या तक्रारी वाढत आहेत, तर दुसरीकडे माध्यम स्वातंत्र्यावर नियंत्रण येईल अशी भीतीही व्यक्त केली जाते.

म्हणूनच माध्यम नियमनाचा कोणताही कायदा हा सरकारला टीकात्मक पत्रकारिता दाबण्याचे साधन नसून, जबाबदार पत्रकारितेला संरक्षण आणि नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करणारी संतुलित व्यवस्था असली पाहिजे. नियमनाच्या नावाखाली स्वतंत्र पत्रकार, लहान डिजिटल माध्यमे किंवा सत्तेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या आवाजांना गप्प बसवण्याचा प्रयत्न झाला, तर तोही लोकशाहीसाठी तितकाच धोकादायक ठरेल.

दिल्ली उच्च न्यायालयाच्या निरीक्षणामुळे आता चेंडू केंद्र सरकार आणि संसदेच्या कोर्टात गेला आहे. सरकार माध्यम क्षेत्रासाठी अशी चौकट उभी करणार का जी बनावट पत्रकारिता, खंडणी, अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचाराला आळा घालेल, पण त्याचवेळी स्वतंत्र, निर्भीड आणि लोकहितवादी पत्रकारितेचे घटनात्मक संरक्षणही अबाधित ठेवेल?

हा प्रश्न केवळ पत्रकारितेचा नाही; तो लोकशाहीवरील जनतेच्या विश्वासाचा आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचा आहे.

### सारांश वृत्त

#### दिघी पोलीस ठाण्यातील PSI लाच घेताना रंगेहात! तीन दिवसांची पोलीस कोठडी;

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या दिघी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक (PSI) चेत्ताली बाळासाहेब गपाट यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) ३ लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक केल्यानंतर न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. ACB च्या माहितीनुसार, तक्रारदाराविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि संबंधित प्रकरणात ‘बी-फायनल’ अहवाल दाखल करण्याच्या बदल्यात सुरुवातीला ८ लाखांची लाच मागण्यात आली होती. पडताळणीनंतर ही मागणी ३ लाखांवर निश्चित झाली. १५ जुलै २०२६ रोजी दिघी पोलीस ठाण्यात तक्रारदाराकडून ३ लाखांची लाच स्वीकारताना ACB ने सापळा रचून झडख चेत्ताली गपाट यांना रंगेहात पकडले. दरम्यान, न्यायालयाने आरोपीला तीन दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड दिली असून, या कालावधीत लाचखोरीमागे आणखी कोणाचा सहभाग होता का, अशा प्रकारच्या इतर प्रकरणांशी काही संबंध आहेत का आणि लाचेच्या मागणीमागे मोठे जाळे कार्यरत होते का, याचा तपास केला जाणार आहे.

ही घटना पुन्हा एकदा पोलीस दलातील भ्रष्टाचाराचा गंभीर प्रश्न समोर आणते. कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांवरच लाचखोरीचे आरोप होत असतील, तर सामान्य नागरिकाने न्यायव्यवस्थेवर विश्वास कसा ठेवायचा? भ्रष्टाचाराविरोधात शून्य सहनशीलतेचे दावे सातत्याने केले जात असताना अशा घटना प्रशासनाच्या अंतर्गत देखरेख आणि उत्तरदायित्वाच्या यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. आता या प्रकरणाचा तपास केवळ एका अधिकाऱ्यापुरता मर्यादित राहतो की त्यातून पोलीस यंत्रणेतील आणखी धक्कादायक बाबी समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## २०१४ नंतर आंदोलनांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचेनासा झाला? सोनम वांगचुक यांच्या उपोषणावरून राज ठाकरे यांचा केंद्रावर घणाघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा १९ वा दिवस उलटूनही केंद्र सरकारकडून कोणताही अधिकृत संवाद किंवा तोडगा निघालेला नसल्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर तीव्र टीका केली आहे. सरकारला सोनम वांगचुक यांचाच नव्हे, तर देशातील आंदोलनाच्या परंपरेचाच बळी घ्यायचा आहे, असा आरोप करत त्यांनी सरकारच्या आंदोलनांबाबतच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

नीट पेपरफुटी प्रकरण, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी आणि शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेसाठी सोनम वांगचुक यांनी सुरू केलेल्या उपोषणामुळे त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम झाल्याचे समोर येत आहे. वजन घटणे आणि प्रकृती खालावल्याच्या बातम्या समोर येत असतानाही सरकारकडून संवादाचा अभाव असल्याची टीका होत आहे.

राज ठाकरे यांनी समाजमाध्यमावरील आपल्या पोस्टमध्ये आरोप केला की, लोकशाहीतील निष्पक्ष संस्था कमकुवत होत असून, सत्तेला प्रश्न विचारणाऱ्यांना दुर्लक्षित करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्यांनी माध्यमांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करत, सत्ताधाऱ्यांना अस्वस्थ करणारे प्रश्न विचारण्याऐवजी विरोधकांना लक्ष्य करण्याचे काम सुरू असल्याचा आरोप केला.

त्यांच्या टीकेचा केंद्रबिंदू केवळ वांगचुक यांचे उपोषण नव्हता, तर २०१४ नंतर आंदोलनांकडे पाहण्याच्या केंद्र सरकारच्या दृष्टिकोनावरही होता. अनेक महत्त्वाच्या आंदोलनांमध्ये आंदोलनकर्त्यांशी संवाद साधण्याऐवजी प्रशासनिक किंवा कायदेशीर कारवाईचा मार्ग स्वीकारला गेल्याची टीका विरोधक सातत्याने करत आले आहेत. शेतकरी आंदोलन, विविध भरती परीक्षा, बेरोजगारी, महागाई, कुस्तीपटूंचे आंदोलन आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरही सरकारवर संवादाऐवजी दडपशाहीचा आरोप झाला आहे. सरकार मात्र अशा आरोपांचे सातत्याने खंडन करत, कायदा-सुव्यवस्था राखणे आणि राष्ट्रीय हित जपणे हेच आपले प्राधान्य असल्याचे सांगत आले आहे.

राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये भाजपवर उपरोधिक टीका करत, जोपर्यंत एखादी व्यक्ती सत्तेच्या सोयीची असते, तोपर्यंत ती प्रिय असते; नंतर तिच्याकडे दुर्लक्ष केले जाते, असे म्हटले. तसेच, निवडणुकीतील विजय म्हणजे सरकारला जनतेचे सर्व प्रश्न दुर्लक्षित करण्याचा परवाना मिळत नाही, असेही त्यांनी सूचित केले.

मनसेने सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा जाहीर केला असून, समाजानेही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे.

## रथयात्रेत गर्दीचा बळी; पुरीत दोन भाविकांचा मृत्यू, शंभरहून अधिक जखमी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुरी (ओडिशा) / वृत्तसंस्था :**

ओडिशातील जगप्रसिद्ध जगन्नाथ रथयात्रेदरम्यान प्रचंड गर्दीमुळे झालेल्या दुर्घटनेत दोन भाविकांचा मृत्यू झाला असून, शंभरहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. या घटनेमुळे रथयात्रेच्या नियोजन आणि गर्दी व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ग्रँड रोड परिसरात रथयात्रा पाहण्यासाठी लाखो भाविकांनी गर्दी केली होती. गर्दीचा दबाव अचानक वाढल्याने अनेकांना श्वास घेण्यास त्रास झाला. या घटनेत एका महिला भाविकाचा गुदमरल्याने मृत्यू झाला, तर ३५ वर्षीय अनिल दास यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. बेशुद्ध पडलेल्या आणि जखमी झालेल्या भाविकांना तातडीने पुरी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, प्रशासनाने अधिकृतरीत्या चेंगराचेंगरी झाल्याचा दावा फेटाळला आहे. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, प्रचंड गर्दीमुळे काही भाविकांना गुदमरल्याने ही दुर्घटना घडली. मात्र, प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार काही ठिकाणी गर्दीचा ताण अनियंत्रित झाला होता. भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या रथयात्रेसाठी प्रशासनाने मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती. ओडिशाचे पोलीस महासंचालक (ऋ्झ) वाय. बी. खुरानिया यांनी सांगितले की, १९ आयपीएस अधिकाऱ्यांसह सुमारे १३ हजार पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले होते. तरीही एवढ्या मोठ्या सुरक्षा यंत्रणेनंतरही गर्दी नियंत्रणात त्रुटी राहिल्या का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने घटनास्थळावरील परिस्थितीचा आढावा घेतला असून, जखमींवर उपचार सुरू आहेत.

## इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे मायलेज कमी? आदित्य ठाकरेंचे मोदींना पत्र; ग्राहकांना पर्याय देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई । विशेष विश्लेषण**

इथेनॉलमिश्रित पेट्रोलमुळे वाहनांचे मायलेज कमी होत असल्याच्या तक्रारींवरून राजकारण तापले असून, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते तथा आमदार आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या धोरणाचा फेरविचार करण्याची मागणी केली आहे.

आदित्य ठाकरे यांनी पत्रात म्हटले आहे की, देशभरातील अनेक वाहनधारक, विशेषतः युवक आणि मध्यमवर्गीय नागरिक, इथेनॉल मिश्रण वाढल्यानंतर वाहनांचे मायलेज कमी झाल्याची तक्रार करत आहेत. सध्या अनेक वाहनांची रचना जास्त प्रमाणातील इथेनॉलयुक्त इंधनासाठी करण्यात आलेली नसल्याने ग्राहकांवर या धोरणाचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचा दावा त्यांनी केला.

ग्राहकांना १०० टक्के पेट्रोल आणि इथेनॉलमिश्रित पेट्रोल असे दोन्ही पर्याय उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी त्यांनी पंतप्रधानांकडे केली आहे. कोणत्याही एका प्रकारचे इंधन अनिवार्य करण्याऐवजी नागरिकांना निवडीचा अधिकार मिळावा, असेही त्यांनी पत्रात नमूद केले. याशिवाय, इथेनॉल निर्मितीसाठी वाढत्या ऊस लागवडीमुळे पाणीटंचाईग्रस्त भागांवर अतिरिक्त ताण येऊ शकतो, अशी चिंताही आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केली. तसेच, या धोरणाचा फायदा काही विशिष्ट औद्योगिक गटांना होत असल्याची धारणा समाजात निर्माण झाली असून, केंद्र सरकारने याबाबत पारदर्शकपणे स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. दरम्यान, केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी यापूर्वी इथेनॉलविरोधातील काही सोशल मीडिया मोहिमा जाणीवपूर्वक राबवल्या जात असल्याचा दावा केला होता. केंद्र सरकारचे म्हणणे आहे की, इथेनॉल मिश्रणामुळे कच्च्या तेलावरील आयात अवलंबित्व कमी होण्यास, शेतकऱ्यांना पर्यायी बाजारपेठ मिळण्यास आणि प्रदूषण कमी करण्यास मदत होते. मात्र, वाहनांच्या मायलेज आणि कार्यक्षमतेबाबत उपस्थित होत असलेल्या शंकांमुळे या धोरणावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

## मतदारसंघ फेररचना की सत्तेची नवी गणिते? खर्गेंचे मोदींना पत्र; संसदीय लोकशाहीच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**

देशातील प्रस्तावित मतदारसंघ फेररचनेच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण अधिक तापू लागले असून, हा वाद आता केवळ मतदारसंघांच्या सीमांपुरता मर्यादित राहिलेला नाही. देशाच्या संसदीय लोकशाहीतील प्रतिनिधित्व, संघराज्यीय संतुलन आणि निवडणूक व्यवस्थेवरील जनविश्वास या मूलभूत प्रश्नांपर्यंत हा वाद पोहोचला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून या विषयावर तातडीने सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची मागणी केली आहे.

खर्गे यांनी पत्रात नमूद केले आहे की, मतदारसंघ फेररचना हा देशाच्या भवितव्याशी संबंधित अत्यंत संवेदनशील विषय आहे. त्यामुळे सरकारने कोणताही निर्णय एकतर्फी घेण्याऐवजी सर्व राजकीय पक्ष, सर्व राज्ये आणि घटनातज्ज्ञ यांच्याशी सविस्तर चर्चा करावी. त्यांनी यापूर्वी संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनाही अशी बैठक बोलावण्याची विनंती केली होती. मात्र, त्यावर कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

खर्गे यांनी १३१ व्या घटनादुरुस्तीशी संबंधित विधेयकाचाही उल्लेख करत, सरकार सुधारित विधेयक आणण्याच्या तयारीत असल्याच्या वृत्तांच्या पार्श्वभूमीवर व्यापक राजकीय चर्चा अपरिहार्य असल्याचे म्हटले आहे.

मात्र या संपूर्ण घडामोडींमुळे एक गंभीर राजकीय प्रश्न उपस्थित होत आहे. मतदारसंघ फेररचना ही लोकसंख्येच्या आधारे प्रतिनिधित्व संतुलित करण्यासाठीची घटनात्मक प्रक्रिया आहे की तिचा वापर भविष्यातील राजकीय समीकरणे बदलण्यासाठी केला जाणार आहे? हा प्रश्न विरोधकांकडून सातत्याने उपस्थित केला जात आहे. सरकारने अद्याप याबाबत सविस्तर भूमिका जाहीर केलेली नसल्याने संशय आणि राजकीय आरोपांना अधिक वाव मिळत आहे.

विशेषतः दक्षिण भारतातील अनेक राज्यांनी या प्रक्रियेबाबत चिंता व्यक्त केली आहे. लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणात यशस्वी ठरलेल्या राज्यांचे लोकसभा प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जर असे झाले, तर लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवलेल्या राज्यांनाच राजकीय प्रतिनिधित्वाच्या बाबतीत फटका बसणार का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

याच पार्श्वभूमीवर संघराज्यीय व्यवस्थेचे स्वरूपही चर्चेत आले आहे. भारताची संसदीय लोकशाही ही केवळ लोकसंख्येच्या गणितावर नव्हे, तर विविध राज्यांमधील समतोल प्रतिनिधित्व, घटनात्मक मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेवर आधारित आहे. त्यामुळे मतदारसंघ फेररचनेसारखा निर्णय व्यापक राजकीय सहमतीनेच व्हावा, अशी मागणी अनेक राजकीय पक्षांकडून होत आहे.

विरोधकांचा आरोप आहे की, गेल्या काही वर्षांत अनेक महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांपूर्वी सर्वपक्षीय चर्चेची परंपरा कमकुवत झाली आहे. अशा परिस्थितीत मतदारसंघ फेररचनेसारख्या संवेदनशील विषयावरही पुरेशी चर्चा न झाल्यास, लोकशाही प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत होऊ शकतो, अशी त्यांची भीती आहे.

दुसरीकडे, केंद्र सरकारने अद्याप कोणताही अंतिम फेररचना आराखडा सार्वजनिक केलेला नाही किंवा खर्गे यांच्या पत्रावर अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे सरकारची नेमकी भूमिका स्पष्ट होणे बाकी आहे. घटनात्मकदृष्ट्या फेररचना ही स्वतंत्र आयोगाच्या शिफारशींवर आधारित प्रक्रिया असते आणि अंतिम निर्णय त्यानुसार घेतले जातात. तथापि, या विषयाने आता देशात एक व्यापक चर्चा सुरू केली आहे. लोकशाहीतील प्रतिनिधित्वाची रचना बदलणाऱ्या प्रक्रियेवर सर्वपक्षीय सहमती आवश्यक आहे का? लोकसंख्या, संघराज्यीय समतोल आणि लोकशाहीतील न्याय या तिन्हींचा समन्वय कसा साधला जाणार? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे देण्याची जबाबदारी सरकारवर आहे. कारण मतदारसंघांची फेररचना हा केवळ नकाशा बदलण्याचा विषय नाही; तो भारतीय संसदीय लोकशाहीतील प्रत्येक नागरिकाच्या प्रतिनिधित्वाशी आणि लोकशाहीवरील विश्वासाशी संबंधित प्रश्न आहे. अशा परिस्थितीत पारदर्शकता, सर्वसमावेशक चर्चा आणि घटनात्मक प्रक्रियेचे काटेकोर पालन हीच कोणत्याही सरकारची सर्वात मोठी जबाबदारी ठरते. कोणतीही प्रक्रिया निष्पक्ष असल्याचा विश्वास निर्माण करणे हे सरकार आणि सर्व राजकीय पक्षांच्या सामूहिक उत्तरदायित्वाचा भाग आहे.

## संपादकीय

### ‘नारी शक्ती’ की ‘मतशक्ती’? महिलांचा सन्मान की महिलांच्या मतांचं राजकारण?

भारताच्या लोकशाहीत आज सर्वात प्रभावशाली मतदारवर्ग कोणता असेल, तर तो महिलांचा आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुमारे ३१.२ कोटी महिलांनी मतदान केले, ही देशाच्या निवडणूक इतिहासातील विक्रमी नोंद आहे. महिलांचे वाढते मतदान हे भारतीय लोकशाहीचे सकारात्मक चित्र आहे. मात्र याच वास्तवातून एक कठोर प्रश्न उभा राहतोसरकारे महिलांना खऱ्या अर्थाने निर्णय प्रक्रियेत सहभागी करत आहेत की त्यांच्या मतांना राजकीय गणिताचा केंद्रबिंदू बनवत आहेत? सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेने ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ मंजूर केला. या कायद्यात लोकसभा आणि विधानसभांमध्ये ३३ टक्के महिला आरक्षणाची तरतूद आहे. हे निश्चितच ऐतिहासिक पाऊल मानले गेले. पण या कायद्याचा सर्वात मोठा वाद त्याच्या अंमलबजावणीवर आहे. कारण हे आरक्षण जनगणना आणि त्यानंतरच्या मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडण्यात आले आहे. म्हणजे कायदा मंजूर झाला, पण महिलांना प्रत्यक्ष जागा कधी मिळतील, याची निश्चित तारीख आजही नाही. सरकारचे म्हणणे आहे की ही घटनात्मक प्रक्रिया आहे आणि ती पूर्ण झाल्यानंतरच आरक्षण लागू होऊ शकते. दुसरीकडे विरोधक आणि अनेक महिला संघटना असा आरोप करतात की अंमलबजावणी पुढे ढकलल्यामुळे या निर्णयाचा राजकीय फायदा आधी घेतला गेला, पण महिलांना तातडीचे प्रतिनिधित्व मिळाले नाही. हा आरोप आहे; तो सिद्ध झालेला तथ्य नाही. पण प्रश्न विचारणे हे लोकशाहीचे कर्तव्य आहे.

जर महिलांच्या सक्षमीकरणाबाबत सरकार इतके गंभीर होते, तर हा कायदा मंजूर झाल्यानंतर तातडीने अंमलबजावणी होईल, अशी यंत्रणा का तयार करण्यात आली नाही? घोषणेला टाळ्या मिळाल्या, पण महिलांना जागा मिळाल्या का?

याच काळात केंद्र आणि अनेक राज्य सरकारांनी महिलांसाठी विविध योजना जाहीर केल्या. थेट आर्थिक मदत, मोफत प्रवास, गॅस अनुदान, ‘लाडकी बहीण’सारख्या योजना, शिष्यवृत्ती आणि इतर लाभ योजनांचा विस्तार करण्यात आला. या योजनांमुळे लाखो महिलांना आर्थिक आधार मिळाल्याचे वास्तव नाकारता येत नाही. अनेक गरीब कुटुंबांसाठी ही मदत महत्त्वाची ठरली आहे. पण दुसरा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. महिलांना दरमहा काही हजार रुपयांची मदत देणे म्हणजे सक्षमीकरण की निर्णयक्षमतेची संधी देणे हे खरे सक्षमीकरण?

आर्थिक मदत आवश्यक असते; पण ती महिलांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्वायत्तता देते का? महिलांना समान वेतन, सुरक्षित कार्यस्थळ, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा, उद्योगासाठी कर्ज, नेतृत्वाच्या संधी आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग मिळत नसेल, तर केवळ कल्याणकारी योजनांमुळे सक्षमीकरण पूर्ण होईल का?

आज प्रत्येक निवडणुकीत महिला मतदार निर्णायक ठरत आहेत. अनेक राज्यांत महिलांचे मतदान पुरुषांपेक्षा जास्त झाले आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष महिलांसाठी स्वतंत्र घोषणा करतात. हा लोकशाहीचा भाग आहे. परंतु महिलांकडे मतदार म्हणून पाहिले जाते की धोरणनिर्माती म्हणून? हा प्रश्न अधिक गंभीर आहे. इतिहास पाहिला तर महिलांच्या नावाने अनेक घोषणा झाल्या; पण संसद, विधानसभांमधील त्यांचे प्रतिनिधित्व अजूनही लोकसंख्येच्या प्रमाणात नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणामुळे हजारो महिला नेतृत्वात आल्या, हे यशस्वी उदाहरण आहे. मग राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरही तोच वेग का दिसत नाही? सरकार कोणतेही असोकेंद्रातील किंवा राज्यातीलमहिलांच्या सन्मानाचा खरा कस घोषणांमध्ये नाही, तर निर्णय प्रक्रियेत त्यांच्या समान सहभागात असतो. महिलांच्या सन्मानाची भाषा निवडणुकांच्या काळात सर्वाधिक ऐकू येते. पण निवडणुका संपल्यानंतर महिलांच्या सुरक्षेचे प्रश्न, रोजगारातील असमानता, वेतनातील तफावत, राजकीय प्रतिनिधित्व आणि न्यायव्यवस्थेतील विलंब यावर तेवढ्याच ताकदीने काम होते का? हा प्रश्न केवळ एका सरकारला नाही, तर गेल्या अनेक दशकांतील सर्व सरकारांना लागू होतो. ‘नारी शक्ती’ हा शब्द प्रभावी आहे. पण त्या शक्तीला सत्ता, निर्णयक्षमता आणि समान संधी मिळत नसतील, तर तो शब्द घोषणांपुरताच मर्यादित राहण्याचा धोका आहे. महिलांचा सन्मान म्हणजे केवळ योजना जाहीर करणे नव्हे. त्यांना संसदेत आवाज देणे, विधानसभेत नेतृत्व देणे, प्रशासनात समान संधी देणे, सुरक्षित समाज निर्माण करणे आणि आर्थिक स्वावलंबनासाठी कायमस्वरूपी व्यवस्था उभी करणे, हेच खरे सक्षमीकरण आहे. लोकशाहीत महिलांना ‘व्होट बँक’ म्हणून नव्हे, तर ‘पॉवर सेंटर’ म्हणून स्वीकारण्याची वेळ आता आली आहे. कारण भारताच्या अर्ध्या लोकसंख्येला फक्त मतदानाचा अधिकार नव्हे, तर समान नेतृत्वाचा अधिकारही आहे. आणि जोपर्यंत हा अधिकार प्रत्यक्षात दिसत नाही, तोपर्यंत कोणत्याही सरकारला हा प्रश्न विचारला जात राहीलमहिलांचा खरोखर सन्मान केला जातोय, की त्यांच्या मतांचा?

# ‘गाव तिथे स्मशानभूमी’चा प्रश्न ऐरणीवर; सरकार जागे झाले की आधीच सुरू होता निर्णयप्रक्रियेचा प्रवास?

## आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात मांडलेल्या मुद्द्यानंतर हालचालींना वेग; मात्र राज्यभरातील वंचित गावांना प्रत्यक्ष सुविधा कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / पिंपरी-चिंचवड :** राज्यातील शेकडो गावांमध्ये आजही अंत्यसंस्कारासाठी स्वतंत्र स्मशानभूमी किंवा शेड नसल्याचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. विधान परिषदेत आमदार अमित गोरखे यांनी हा विषय लक्षवेधी आणि उपप्रश्नाच्या माध्यमातून उपस्थित केल्यानंतर ग्रामविकास विभागाने जिल्हानिहाय आढावा घेऊन उर्वरित गावांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू केल्याचे स्पष्ट केले आहे.

अमित गोरखे यांनी सभागृहात मांडलेल्या मुद्द्यात पावसाळा आणि उन्हाळ्यात अंत्यसंस्कारासाठी योग्य जागा नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे सांगितले. त्यांनी ‘गाव तिथे स्मशानभूमी’ योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबवण्याची मागणी केली.

यावर उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यातील सुमारे ८० टक्के गावांमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध असल्याचे सांगितले.



उर्वरित गावांची अंतिम यादी तयार करण्याचे काम सुरू असून जिल्हा नियोजन समिती (झउ)च्या माध्यमातून निधी उपलब्ध करून हा प्रश्न टप्प्याटप्प्याने सोडवला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

शासनाने यासाठी काही महत्त्वाचे निर्णयही जाहीर केले आहेत. स्मशानभूमी नसलेल्या गावांमध्ये प्रथम ही सुविधा उभारण्यास प्राधान्य, झउ निधीतून तरतूद, जागेअभावी सामूहिक स्मशानभूमीचा पर्याय आणि आवश्यकतेनुसार गायरान किंवा भूसंपादनाद्वारे जमीन उपलब्ध करून देण्याचा विचार करण्यात येत असल्याचे सरकारने सांगितले.

मात्र या घोषणांबरोबरच काही महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित होत आहेत.

* जर हा प्रश्न अनेक वर्षांपासून अस्तित्वात होता, तर तो आतापर्यंत का प्रलंबित राहिला?

* ‘गाव तिथे स्मशानभूमी’ योजना प्रत्यक्षात किती गावांमध्ये पूर्ण झाली आणि किती गावांमध्ये अद्याप अपूर्ण आहे?

* ज्या गावांमध्ये सुविधा नाहीत, त्यांना निश्चित कालमर्यादेत स्मशानभूमी मिळणार का?

* घोषणेनंतर निधी आणि अंमलबजावणीवर नियमित देखरेख कोण करणार?

आमदार अमित गोरखे यांच्या हस्तक्षेपामुळे हा विषय पुन्हा राज्याच्या चर्चेत आला, हे निर्विवाद आहे. मात्र एखादा प्रश्न सभागृहात मांडला जाणे आणि तो प्रत्यक्षात पूर्णपणे सुटणे यात मोठा फरक असतो. त्यामुळे आता खरी कसोटी सरकारच्या अंमलबजावणीची असेल. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी सन्मानाने अंत्यसंस्काराची सुविधा ही मूलभूत नागरी गरज आहे, राजकीय घोषणांचा विषय नाही. त्यामुळे राज्यभरातील वंचित गावांपर्यंत स्मशानभूमी आणि आवश्यक सुविधा प्रत्यक्षात किती लवकर पोहोचतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोशी दुर्घटनाग्रस्तांना न्यायाचे आश्वासन; मृतांच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त मदत देणार : अभिषेक बारणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोशी कचरा डेपो परिसरातील दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना जास्तीत जास्त आर्थिक व अन्य आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, तसेच जखमींना उपचार आणि पुनर्वसनासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक नेते अभिषेक बारणे यांनी दिली.



दुर्घटनाग्रस्तांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर बारणे यांनी त्यांच्या दुःखात सहभागी होत प्रशासनाने मदत प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई करू नये, अशी मागणी केली. मृतांच्या कुटुंबीयांना योग्य भरपाई, तसेच जखमींना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांशी पाठपुरावा केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

बारणे म्हणाले की, अशा दुर्घटना पुन्हा घडू नयेत यासाठी जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कारवाई होणे तितकेच आवश्यक आहे. कामगारांच्या सुरक्षेशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी महापालिका आणि संबंधित यंत्रणांनी आवश्यक उपाययोजना कराव्यात.

मोशी दुर्घटनेनंतर सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटी, कंत्राटी कामगारांच्या सुरक्षिततेचे प्रश्न आणि महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मदत आणि चौकशी या दोन्ही बाबींमध्ये पारदर्शक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ‘एक दिवस शाळेसाठी’ उपक्रम

### पिंपरी-चिंचवड पोलिसांचा मोठा उपक्रम! ३१ व्या टप्प्यात तब्बल १८३५ विद्यार्थ्यांशी साधला थेट संवाद; रस्ते सुरक्षा आणि सायबर गुन्ह्यांबाबत केले मार्गदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षा, वाहतुकीचे नियम आणि सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती करण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय वाहतूक शाखेच्या वतीने 'एक दिवस शाळेसाठी' हा अभिनव उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाच्या ३१ व्या टप्प्यांतर्गत आज (१६ जुलै) वाहतूक शाखेच्या १२ अधिकारी आणि १८ अंमलदारांच्या एकूण १४ पथकांनी निवडक १४ शाळांमधील तब्बल १,८३५ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना पीपीटी (झझढ) द्वारे अभ्यासपूर्ण व मुद्देसूद मार्गदर्शन केले.

**१ लाख १३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन!**

वाहतूक शाखेच्या वतीने दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या गुरुवारी हा उपक्रम राबवला जातो. विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षा, वाहतूक नियमन, अपघात टाळणे, अमली पदार्थ व व्यसनाधीनतेपासून दूर राहणे, सायबर गुन्हेगारी आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर पोलिसांकडून थेट मार्गदर्शन केले जाते. आतापर्यंत पार पडलेल्या ३१ टप्प्यांमध्ये तब्बल ५०२ शाळांमधील १,१३,१७१ विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस सह आयुक्त शशांक महावरकर, अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप-आयुक्त (वाहतूक शाखा) विक्रांत देशमुख व त्यांच्या संपूर्ण टीमने या नियोजनबद्ध उपक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

या विद्यार्थीभिमुख उपक्रमाचा पुढील टप्पा गुरुवार, दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे.

## मोशी दुर्घटनेनंतर महापालिकेला जाग; प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याची हालचाल

### आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे जागा निश्चितीचे आदेश; विकेंद्रित कचरा व्यवस्थापनावर भर, मोशी डेपोवरील ताण कमी करण्याचा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर असतानाच पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील कचरा प्रक्रिया विकेंद्रित करण्याच्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी योग्य जागा निश्चित करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले असून, त्यानुसार प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत.

या संदर्भात अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि कार्यकारी अभियंत्यांची प्राथमिक बैठक घेऊन उपलब्ध जागांचा आढावा घेतला. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत प्रक्रिया केंद्रासाठी योग्य जागा निश्चित करून त्याचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या.

महापालिकेच्या म्हणण्यानुसार, शहरात दररोज निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची स्थानिक पातळीवरच प्रक्रिया करण्यासाठी विकेंद्रित व्यवस्था उभारण्यात येणार आहे. त्यामुळे मोशी येथील कचरा डेपोवरील ताण कमी होईल आणि कचऱ्याची वाहतूक, साठवण तसेच विल्हेवाट अधिक कार्यक्षमपणे करता येईल, असा प्रशासनाचा दावा आहे. जागा निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कचरा प्रक्रिया केंद्रांची उभारणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक आराखडा आणि अंमलबजावणीचे नियोजन लवकरच अंतिम करण्याचे निर्देशही आयुक्तांनी प्रशासनाला दिले आहेत. मात्र, या निर्णयामुळे काही महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित होत आहेत. शहरातील प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत प्रक्रिया केंद्रासाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे का? स्थानिक नागरिकांचा विरोध टाळण्यासाठी महापालिका कोणती भूमिका घेणार? तसेच, मोशी डेपोवरील अवलंबित्व कमी करण्याचे आश्वासन यापूर्वीही अनेकदा देण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी का झाली नाही, याची उत्तरेही प्रशासनाला द्यावी लागणार आहेत. मोशी कचरा डेपोतील दुर्घटनेनंतर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. अशा पार्श्वभूमीवर विकेंद्रित कचरा प्रक्रिया केंद्रांची घोषणा ही केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात आणि वेळेत पूर्ण होते का, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# पिंपरी-चिंचवड क्राईम डायरी : सायबर पोलिसांकडून लाखो रुपयांची फसवणूक करणारा गजाआड, तर शिरगावमध्ये बेकायदेशीर गावठी दारू जप्त!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय क्षेत्रात गुन्हेगारांवर जरब बसवण्यासाठी पोलिसांनी धडक कारवाई सुरू केली आहे. १५ जुलै रोजी रात्री दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये सायबर भामट्याला अटक करण्यात आली असून बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

**अभिजित डेव्हलपरच्या नावाखाली ५४ लाखांची सायबर फसवणूक; आरोपी अटकेत**

बँक खात्यांचा गैरवापर करून नागरिकांची लाखो रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीचा सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. आरोपी कुणाल हनुमंत सातपुते (वय २४, रा. देहूरोड) याने त्याच्या साथीदारांसह मिळून 'ABHIJIT WEB DEVELOPER' या नावाने बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये बनावट खाते उघडले होते. या खात्यावर नागरिकांची फसवणूक करून जमा झालेली ५४,६२,५५३/- रुपयांची रक्कम ट्रान्सफर करण्यात आली. यातील एकूण १,०५,६३,५००/- रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. सपोनि वैभव पाटील या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

**शिरगावमध्ये मानवी जिवाला धोका ठरणारी गावठी दारू जप्त!**

शिरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गहुंजे-शिरगाव रस्त्याच्या कडेला, पत्राशेडच्या आडोशाला बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टीची दारू विकणाऱ्या विनायक ईश्वर राजपूत (वय २५, रा. कंजारभाट वस्ती, शिरगाव) याला पोलिसांनी रंगेहात अटक केली आहे. मानवी जिवाला धोकादायक ठरेल अशी रसायने मिश्रित २८ लिटर गावठी दारू (किंमत २,८०० रुपये) आरोपीकडून जप्त करण्यात आली आहे. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या या आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**काळेवाडीत सायबर फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल**

काळेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहटणी गाव परिसरामध्ये सायबर फसवणुकीचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. आरोपी प्रेम नंदू लोखंडे (वय १९, रा. थेरगाव, पुणे) याने फिर्यादी भास्कर किसन भारती यांच्या तक्रारीनुसार 'जळगाव जनता सहकारी बँक' खात्याचा वापर करून फसवणूक केल्याप्रकरणी आयटी ॲक्ट आणि भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

**पिंपरी-चिंचवड पोलिसांची अंमली पदार्थ तस्करांवर मोठी कारवाई! एमडी पाऊडर आणि अफूच्या बोंडाचा चुरा जप्त; ३१ लाखांच्या फसवणुकीचा मास्टरमाईंडही जेरबंद**

पिंपरी-चिंचवड:

पिंपरी-चिंचवड शहरात गुन्हेगारी आणि अंमली पदार्थ (ड्रग्ज) तस्करांचे कंबरडे मोडण्यासाठी पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. शहरातील वेगवेगळ्या भागात अंमली पदार्थ विरोधी पथक आणि स्थानिक पोलिसांनी कारवाया करत ड्रग्ज तस्कर, जुगार अड्डे आणि सायबर भामट्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. १५ जुलै रोजी रात्री दाखल झालेल्या प्रमुख कारवायांचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे:

**काळभोर नगरमध्ये धाडसी कारवाई; १८ हजारांचे एमडी (चृ) ड्रग्ज आणि वॅगनआर कार जप्त!**

पिंपरी पोलिसांनी सह्याद्री इंडस्ट्रीजसमोरील सार्वजनिक रोडवर (काळभोर नगर, चिंचवड) सापळा रचून एका मोठ्या ड्रग्ज तस्कराला अटक केली आहे. आरोपी शिवा भारत निमजे (वय ३५, रा. तळेगाव दाभाडे, पुणे) याच्या ताब्यातून पोलिसांनी १८,२०० रुपये किमतीची ३.६४ ग्रॅम एमडी (चृ) पाऊडर जप्त केली आहे. हा अंमली पदार्थ बेकायदेशीररित्या विक्री करण्यासाठी तो कारमधून आला होता. पोलिसांनी ड्रग्जसह त्याची अंदाजे ५,००,००० रुपये किमतीची ग्रे रंगाची मारुती वॅगनआर कार (क्र. चक१४ घग ५००४) जप्त केली आहे. अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सपोनि अतिग्रे या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## चिखलीतील पाणी साचण्याच्या संकटावर यावेळी खरोखरच कायमस्वरूपी उपाय होणार, की पुन्हा आश्वासनांचीच पुनरावृत्ती?

### महापौर रवी लांडगे यांची अधिकाऱ्यांसह पाहणी; नागरिकांचा सवाल; पाहण्या अनेक झाल्या, आता प्रत्यक्ष काम कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** मागील आठवड्यातील अतिवृष्टीनंतर चिखलीच्या घरकुल परिसरात पाणी साचून शेकडो नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर महापौर रवी लांडगे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह परिसराची पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजनांचे निर्देश दिले. मात्र या पाहणीनंतर एक महत्त्वाचा प्रश्न पुन्हा समोर आला आहेयावेळी खरोखरच शाश्वत तोडगा निघणार, की हीदेखील केवळ आणखी एक राजकीय पाहणी ठरणार?



महापौरांनी जलनिस्सारण, स्थापत्य, पाणीपुरवठा आणि इतर विभागांच्या अधिकाऱ्यांसह पाणी साचण्यामागील तांत्रिक कारणांचा आढावा घेतला. नाल्यांची क्षमता वाढविणे, अडथळे दूर करणे, जलवाहिन्यांचे नियोजन आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. परंतु स्थानिक नागरिकांचे म्हणणे वेगळे आहे. त्यांच्या मते, प्रत्येक पावसाळ्यानंतर अधिकारी आणि लोकप्रतिनिधी पाहणी करतात, आश्वासने देतात; मात्र पुढील पावसात पुन्हा त्याच ठिकाणी पाणी साचते. त्यामुळे पाहण्या आणि बैठका यापलीकडे प्रत्यक्ष काम किती वेगाने लक्ष लागले आहे.

या घटनेमुळे काही महत्त्वाचे प्रश्नही उपस्थित होत आहेत

* घरकुल परिसरात पाणी साचण्याचे मूळ कारण आजपर्यंत कायमस्वरूपी का दूर झाले नाही?

* या भागाच्या जलनिस्सारण आराखड्यात त्रुटी आहेत का?

* पूर्वी मंजूर झालेल्या कामांचे काय झाले?

* यावेळी कामांसाठी निश्चित कालमर्यादा आणि निधी जाहीर केला जाणार का?

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# खडकवाडीत बिबट्यांचा वावर वाढला

## ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण, वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी


■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** लोणी-धामणी । दैनिक राज्य लोकतंत्र । दि. १६ जुलै २०२६

आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बुधवारी (दि. १५) रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास खुडा वस्ती येथे दत्तात्रय तुकाराम डोके यांच्या घरासमोर एकाच वेळी दोन बिबटे आल्याची घटना घडली.

कुत्री सतत भुंकत असल्याने डोके हे घराबाहेर आले. त्यावेळी परिसरात लोडशेडिंग असल्याने वीज नव्हती. त्यांनी बॅटरीचा प्रकाश टाकला असता समोर दोन बिबटे उभे असल्याचे दिसले. प्रकाश पडताच दोन्ही बिबटे तेथून पळून गेले.

या घटनेबाबत माजी सरपंच अनिल डोके यांनी सांगितले की, महावितरणकडून सायंकाळी ७.३० ते रात्री ११.३० या वेळेत लोडशेडिंग केले जात आहे. ही वेळ शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी अत्यंत गैरसोयीची आहे. याच वेळेत शेतकऱ्यांची दूध काढण्याची तसेच



महिलांची स्वयंपाकाची कामे सुरू असतात. अंधारामुळे बिबट्याच्या हालचालींचा धोका अधिक वाढत असून लोडशेडिंगची वेळ तातडीने बदलावी, अशी मागणी त्यांनी केली.

परिसरात यापूर्वीही बिबट्याच्या हालचालींच्या घटना घडल्या असून सध्या पावसाळ्यामुळे शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने तात्काळ पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी केली आहे.

ग्रामस्थांनी वनविभागावरही नाराजी व्यक्त केली असून, बिबट्याच्या घटनांबाबत वेळकाढूपणा होत असल्याचा आरोप केला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी वनविभागाने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

दरम्यान, दुसऱ्या एका घटनेत निरगुडसर येथील विरोबा मंदिर-येवले वस्ती परिसरात बुधवारी (दि. १५) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास शंकर येवले यांच्या गोठ्याजवळही बिबट्या आल्याचे त्यांनी सांगितले.

### लोडशेडिंगची वेळ बदला; अन्यथा आंदोलनाचा इशारा

सध्या खडकवाडीसह परिसरातील अनेक गावांमध्ये रात्रीच्या वेळी लोडशेडिंग सुरू आहे. मात्र ही वेळ बदलून दिवसा वीजपुरवठा खंडित करावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. रात्रीच्या अंधारात बिबट्याचा धोका वाढत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. महावितरणने लोडशेडिंगची वेळ बदलली नाही, तर आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांनी दिला आहे.

---

## सारांश वृत्त

### शिरूर नगरपरिषदेतील ठेका सफाई कामगारांचा किमान वेतनाचा प्रश्न ऐरणीवर; राज्यमंत्री दर्जा लाभलेले गणेश ताठे यांची उपोषणस्थळी भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर :** शिरूर नगरपरिषदेतील ठेका पद्धतीवरील सफाई कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याच्या आरोपावरून सुरू असलेल्या आंदोलनाने आता राज्यस्तराचे लक्ष वेधले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या किमान वेतन आयोग सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा लाभलेले गणेश ताठे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्ते महिबूब सय्यद यांच्याशी चर्चा केली.

यावेळी उपोषणकर्त्यांनी ठेका सफाई कामगारांना शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार वेतन देण्यात यावे, तसेच कामगारांचे श्रमकायद्यानुसार सर्व हक्क सुनिश्चित करावेत, अशी मागणी केली. गणेश ताठे यांनी आंदोलनकर्त्यांचे म्हणणे ऐकून संबंधित प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

मात्र या प्रकरणामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. किमान वेतन कायदा अस्तित्वात असतानाही नगरपरिषदेच्या ठेका कामगारांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळत नसेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? ठेकेदार, नगरपरिषद आणि कामगार विभाग यांनी नियमित तपासणी करूनही ही परिस्थिती का बदलली नाही?

कामगार संघटनांच्या मते, अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ठेका पद्धतीवरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन, ईपीएफ, ईएसआय आणि इतर वैधानिक लाभांपासून वंचित ठेवले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे केवळ भेटी आणि आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष वेतनवाढ, थकबाकीची भरपाई आणि कायद्याची अंमलबजावणी महत्त्वाची असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

आता गणेश ताठे यांच्या भेटीनंतर प्रशासनाकडून ठोस निर्णय होतो की हा प्रश्न पुन्हा आश्वासनांपुरताच मर्यादित राहतो, याकडे शिरूरमधील सफाई कामगारांचे लक्ष लागले आहे.

---

# 'मिशन क्रॅकडाऊन' सुरू, पण अवैध धंदे पोलिसांच्या नाकाखालीच फोफावले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहर पोलिसांनी परिमंडळ-७ मध्ये 'मिशन क्रॅकडाऊन' ही विशेष मोहीम सुरू करत अवैध धंदे, संघटित गुन्हेगारी आणि समाजविघातक कृत्यांविरोधात कारवाईचा धडाका लावल्याचा दावा केला आहे. लोणगाव परिसरात केलेल्या कारवाईत अवैध दारू विक्री, मटका जुगार अड्ड्यांवर छापे टाकून सहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून रोख रक्कम, विदेशी मद्य, जुगार साहित्य आणि मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

पोलिसांनी प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, ब्ल्यू डायमंड आणि राजरत्न हॉटेलमध्ये अवैध मद्यविक्रीवर कारवाई करण्यात आली, तर एका मटका अड्ड्यावर छापा टाकून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. संबंधित आरोपींवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा आणि महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मात्र या कारवाईमुळे एक गंभीर प्रश्न पुन्हा समोर आला आहे. जर पोलिसांना एका दिवसात गुप्त माहितीच्या आधारे हे अवैध धंदे सापडू शकतात, तर हेच व्यवसाय इतके दिवस पोलिसांच्या नजरेतून कसे सुटले? स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक भागांत अवैध दारू, मटका आणि इतर बेकायदेशीर व्यवसाय हे दीर्घकाळापासून सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने होत होत्या. मिशन क्रॅकडाऊन'सारख्या मोहिमा निश्चितच कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वाच्या आहेत. मात्र प्रश्न कारवाईचा नाही, तर प्रतिबंधाचा आहे. जर अवैध धंदे वर्षानुवर्षे सुरू राहतात आणि त्यावर एखादी विशेष मोहीम राबवल्यानंतरच कारवाई होते, तर स्थानिक गुप्तवार्ता यंत्रणा, नियमित तपासणी आणि पोलिसांच्या देखरेखीच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

पोलिस प्रशासनाचे म्हणणे आहे की ही मोहीम पुढेही सातत्याने सुरू राहणार असून नागरिकांनी अवैध धंद्यांची माहिती गोपनीयपणे पोलिसांना द्यावी. मात्र नागरिकांचाही प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहेअवैध व्यवसाय वाढल्यानंतर धाड टाकणे ही यशस्वी पोलिसिंगची खूण आहे की असे धंदे वाढूच नयेत, ही खरी जबाबदारी आहे?

---

# धामणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची 'मॉडेल स्कूल' म्हणून निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची पुणे जिल्हा परिषदेच्या महत्त्वाकांक्षी 'मॉडेल स्कूल' उपक्रमांतर्गत निवड करण्यात आली आहे. राज्याचे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पुणे जिल्हा परिषदेचे विद्यमान उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेचा कायापालट घडवून आणण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत जिल्हा परिषद शाळांचा शहरातील आधुनिक खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या धर्तीवर विकास करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, अद्ययावत पायाभूत सुविधा आणि आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.



धामणी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची पुणे जिल्हा परिषदेच्या 'मॉडेल स्कूल' उपक्रमांतर्गत निवड झाल्यानंतर शाळेला भेट देताना उपस्थित अधिकारी, लोकप्रतिनिधी व मान्यवर.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी धामणी येथील शाळेला भेट देऊन शाळेची सविस्तर पाहणी केली. यावेळी शाळेच्या वतीने उपस्थित अधिकारी आणि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आंबेगाव पंचायत समितीच्या सदस्या अंकिता वाळुंज, धामणीच्या सरपंच प्रतीक्षा जाधव-पाटील, पंचायत समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता मयूर जोशी, कनिष्ठ अभियंता कल्पेश लांडे, टीव्हीएस हरिता कंपनीचे अधिकारी सोमनाथ काटकर, अभियंता साहिल शेख तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# 'यशवंत'च्या जमीन व्यवहाराला पुन्हा स्थगिती; सरकारचा नेमका डाव काय? निर्णयाची टांगती तलवार, पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्य सरकारने पुण्यातील चर्चेत असलेल्या 'यशवंत'च्या जमीन व्यवहाराला पुन्हा एकदा स्थगिती दिल्याने या संपूर्ण प्रकरणाभोवतीचे गूढ अधिकच वाढले आहे. हा व्यवहार मंजूर करायचा की रद्द करायचा, याबाबत सरकार अद्याप ठोस भूमिका घेत नसल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी संबंधित संस्था, हितधारक आणि नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, सरकारच्या निर्णयप्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

एक-दोन वेळा नव्हे, तर वारंवार स्थगिती देण्यामागे नेमके कारण काय? जर व्यवहारात कायदेशीर किंवा प्रशासकीय त्रुटी असतील, तर सरकार तो स्पष्टपणे रद्द का करत नाही? आणि सर्व काही नियमांनुसार असेल, तर मंजुरी देण्यास विलंब का? या दोन्ही प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत.

सरकारकडून या व्यवहाराबाबत कोणतीही सविस्तर अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे हा विलंब केवळ प्रशासकीय आहे की त्यामागे राजकीय किंवा इतर कोणते दबाव आहेत, याबाबत विविध चर्चा सुरू आहेत. निर्णय घेण्याऐवजी फाईलला स्थगितीच्या फेऱ्यात ठेवण्याची पद्धत प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण करते.

जमीन व्यवहारांसारख्या संवेदनशील विषयांमध्ये पारदर्शकता आणि वेळेवर निर्णय घेणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र या प्रकरणात वारंवार बदलणारी भूमिका आणि वाढत जाणारा विलंब यामुळे शासनाच्या धोरणात्मक सातत्यावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

सरकारने जर या व्यवहारावर आक्षेप घेतला असेल, तर त्या आक्षेपांचे स्वरूप सार्वजनिक का केले जात नाही? संबंधित विभागाचा अहवाल काय सांगतो? कोणत्या मुद्द्यांवर निर्णय अडकला आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अंतिम निर्णयासाठी निश्चित कालमर्यादा काय आहे? या प्रश्नांची उत्तरे नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.

---

# 'इठा' चित्रपटात इतिहासाची तोडफोड?; विठाबाई नारायणगावकर यांच्या कुटुंबीयांचा गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित आगामी 'इठा' चित्रपटाच्या टीझरमध्ये ऐतिहासिक तथ्यांची तोडफोड करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. चित्रपटात आवश्यक दुरुस्ती न केल्यास निर्माते व संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई, अब्रूनुकसानीचा दावा आणि राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेत विठाबाई नारायणगावकर यांचे नातू व राज्य शासनाच्या ज्येष्ठ कलावंत अनुदान समितीचे सदस्य धनंजय खुडे यांनी हा आरोप केला. यावेळी कुटुंबीयांसह तमाशा क्षेत्रातील विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

धनंजय खुडे यांनी सांगितले की, चित्रपटाच्या टीझरमध्ये ऐतिहासिक नोंदींशी विसंगत माहिती दाखवण्यात आली आहे. विशेषतः भाऊ बापू (मांग) नारायणगावकर तमाशा मंडळ या मूळ नावाऐवजी भाऊ गावकर तमाशा मंडळ असा चुकीचा उल्लेख करण्यात आला असून, राष्ट्रपती पुरस्कार स्वीकारण्याचा प्रसंगही वस्तुस्थितीशी जुळत नसल्याचा दावा त्यांनी केला. तसेच, विठाबाई नारायणगावकर यांच्या चरित्रावर चित्रपट तयार करताना कुटुंबीयांची संमती घेण्यात आलेली नसल्याचाही आरोप त्यांनी केला. ऐतिहासिक सत्यता, लोककलेचा वारसा आणि कुटुंबीयांच्या भावना यांचा आदर राखत चित्रपटातील वादग्रस्त बाबींमध्ये आवश्यक बदल करावेत, अशी मागणी त्यांनी केली.

---

# कुमशेत येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रमपत्रिकेनुसार जुन्नर तालुक्यातील कुमशेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर उत्साहात पार पडले. हा कार्यक्रम जिल्हा न्यायाधीश तथा जुन्नर तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस. बी. शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली, तर दिवाणी व फौजदारी न्यायाधीश आर. जी. कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला.

यावेळी जुन्नर तालुका बार असोसिएशनच्या उपाध्यक्षा ॲड. निलीमा शेरकर, ॲड. राम कर्पे, ॲड. यू. सी. तांबे, ॲड. विश्वनाथ चव्हाण, ॲड. अविनाश थोरवे, ॲड. अरुण गाडेकर, ॲड. शिवम नायकोडी, ॲड. कर्मेश गाडेकर, जुन्नर तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे, कुमशेतचे सरपंच रविंद्र डोके, माजी सरपंच अंबादास डोके, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात दिवाणी व फौजदारी न्यायाधीश आर. जी. कुंभार यांनी नागरिकांनी कायद्याचे पालन करावे तसेच गावातील तंटे आणि वाद शक्यतो गावपातळीवरच सामंजस्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

शिबिरात विविध कायदेविषयक विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. ॲड. राम कर्पे यांनी आदिवासी समुदायाचे हक्क आणि शासकीय




कल्याणकारी योजनांची माहिती दिली. ॲड. यू. सी. तांबे यांनी मोफत कायदेशीर मदत सेवा तसेच मानसिक आजार आणि बौद्धिक अक्षमता असलेल्या व्यक्तींसाठीच्या कायदेशीर सेवा योजना-२०२४ विषयी मार्गदर्शन केले. ॲड. विश्वनाथ चव्हाण यांनी नागरिकांची मूलभूत कर्तव्ये, ॲड. अविनाश थोरवे यांनी पॉक्सो कायद्याविषयी जनजागृती, तर ॲड. अरुण गाडेकर यांनी नालसा राष्ट्रीय विधी सहाय्य हेल्पलाईन व पोर्टलची माहिती उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना शिक्षक यश घोडे यांनी केली. सूत्रसंचालन श्याम लोलापोड यांनी केले, तर आभार सरपंच रविंद्र डोके यांनी मानले.

---

# जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापन संघाकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नर तालुका विज्ञान व गणित अध्यापन संघाच्या वतीने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षा तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या जुन्नर तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. ही माहिती संघाचे अध्यक्ष प्रवीण ताजणे यांनी दिली.



यावेळी एसएससी परीक्षेत तालुक्यात प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या तन्वी सुनील पेंढोरे (९८.८० टक्के, चैतन्य विद्यालय, ओतूर), स्नेहा सुनील मोढे (९८.६० टक्के, शंकरराव बुट्टे पाटील विद्यालय, जुन्नर) आणि आर्या भानुदास बटवाल (९७.८० टक्के, गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यालय, नारायणगाव) यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत जुन्नर तालुक्यात प्रथम आणि राज्यात सोळावा क्रमांक मिळविणाऱ्या शौर्यराज विजय कुऱ्हाडे (ज्ञानमंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, आळे) याचाही सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ही माहिती संघाचे सचिव प्रकाश जोंधळे यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, शाल आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, चिकाटीचे आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे कौतुक करत उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालक, शिक्षक आणि शाळांचे मोलाचे योगदान असल्याचे संघाचे जिल्हा प्रतिनिधी सुरेश कसार यांनी सांगितले. तर या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळून भविष्यात अधिक यश संपादन करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष पंकज घोलप यांनी व्यक्त केला.

---

# क्रीडा क्षेत्राला उभारी देण्यासाठी कटिबद्ध; उपमहापौर परशुराम वाडेकर यांची ग्वाही

## फिफा फुटबॉल विश्वचषकानिमित्त खेळाडूंकडून विश्वचषकाच्या प्रतिकृतीने सन्मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे शहराची समृद्ध क्रीडा परंपरा कायम राखण्यासाठी तसेच नवोदित खेळाडूंना आवश्यक पायाभूत सुविधा आणि दर्जेदार प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी दिली.

फिफा फुटबॉल विश्वचषक २०२६ निमित्त गेम ऑफ गोल एफसीसी अकादमीच्या वतीने खेळाडूंना सातत्याने प्रोत्साहन देत असल्याबद्दल उपमहापौर वाडेकर यांचा फुटबॉल विश्वचषकाच्या प्रतिकृतीने सन्मान करण्यात आला. अकादमीचे प्रशिक्षक सुशील जोसेफ यांच्या हस्ते त्यांना ही



प्रतिकृती प्रदान करण्यात आली.

यावेळी विठ्ठल गायकवाड, बाबासाहेब कांबळे, नवनीत सिंग गांधी, मनन त्रिवेदी, अशोक शेळके, बाळू सोरटे यांच्यासह खेळाडू आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना वाडेकर म्हणाले, पुणे शहरातून अधिकाधिक गुणवंत खेळाडू घडावेत यासाठी आवश्यक क्रीडा सुविधा आणि प्रशिक्षण व्यवस्था उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः खडकी, दापोडी आणि बोपोडी परिसराला फुटबॉल व हॉकीची समृद्ध परंपरा लाभली असून या खेळांच्या विकासासाठी या भागात सर्व सुविधांनी सुसज्ज क्रीडा स्टेडियम उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

फुटबॉल विश्वचषक स्पर्धेतील अंतिम सामन्यातील दोन्ही संघांना पुणेकरांच्या वतीने शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या. प्रशिक्षक सुशील जोसेफ यांनी सांगितले की, उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सातत्याने खेळाडूंना प्रोत्साहन दिले असून त्यांच्या सहकार्यामुळे खडकी परिसरातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाला निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## सारांश वृत्त

### ‘लाखोंची पाइपलाइन चोरी झाली की नाही?’ : शिरूरकरांचा नगरपरिषदेला जाहीर सवाल; प्रशासनाच्या मौनावर संशय

दैनिक राज्य लोकतंत्र

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर शहरातील कथित लाखो रुपयांच्या पाइपलाइन चोरीच्या प्रकरणावर नगरपरिषद आणि संबंधित जबाबदार यंत्रणा मौन बाळगत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पाइपलाइनची चोरी झाली की नाही, एवढे तरी स्पष्ट सांगा, अशी मागणी शिरूरकरांनी प्रशासनाकडे केली आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पाइपलाइन चोरीची चर्चा अनेक दिवसांपासून सुरू असताना नगरपरिषदेकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. चोरी झाली असल्यास गुन्हा दाखल झाला का, नुकसान किती झाले, जबाबदार कोण आणि चौकशी कुठपर्यंत पोहोचली, याबाबत प्रशासन मौन का बाळगत आहे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या प्रकरणामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत ✻ लाखो रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेची चोरी झाली का नाही? ✻ चोरी झाली असेल तर एफआयआर दाखल करण्यात आला आहे का? ✻ नगरपरिषदेने अधिकृत माहिती जाहीर का केलेली नाही? ✻ संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का? ✻ नागरिकांच्या कराच्या पैशातून उभारलेल्या मालमत्तेचे संरक्षण करण्यात प्रशासन अपयशी ठरले का? प्रशासनाच्या मौनामुळे संशय अधिकच वाढत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

चोरी झाली नसेल, तर त्याबाबत स्पष्ट खुलासा करावा; आणि चोरी झाली असेल, तर दोषींवर कठोर कारवाई करून संपूर्ण माहिती जनतेसमोर मांडावी, अशी मागणी जोर धरत आहे.

लोकशाही व्यवस्थेत सार्वजनिक निधी आणि मालमत्तेबाबत पारदर्शकता ही प्रशासनाची जबाबदारी असते. त्यामुळे या प्रकरणात नगरपरिषदेने मौन सोडून वस्तुस्थिती नागरिकांसमोर मांडणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# ठेवीदारांचा पैसा अडकला, आरोपींना दिलासा नाही; पण आर्थिक घोटाळे रोखण्यात सरकार-प्रशासन अपयशी का?

## आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी आनंद नागरी पतसंस्थेच्या संचालकांचा जामीन पुन्हा फेटाळला; ठेवीदारांचा सवाल – कारवाई गुन्ह्यानंतरच का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी आनंद नागरी पतसंस्थेच्या संचालकांचा जामीन न्यायालयाने पुन्हा एकदा फेटाळला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे तपास यंत्रणांना दिलासा मिळाला असला, तरी हजारो ठेवीदारांचा एकच प्रश्न कायम आहेठेवीदारांचा पैसा बुडाल्यानंतरच सरकार आणि प्रशासन का जागे होते?

पतसंस्था कोसळल्यानंतर संचालकांवर गुन्हे दाखल होतात, अटक होते, जामीन अर्ज फेटाळले जातात; मात्र त्याआधी आर्थिक गैरव्यवहार इतका वाढूच कसा दिला जातो? सहकार विभागाचे लेखापरीक्षण, निबंधक कार्यालयाची देखरेख आणि नियामक यंत्रणा नेमकी काय करत होती, असा प्रश्न या प्रकरणामुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे.

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांत अनेक सहकारी पतसंस्था आणि वित्तीय संस्थांमधील गैरव्यवहारांमुळे हजारो कुटुंबांच्या आयुष्यभराची बचत अडकली आहे. प्रत्येक वेळी सरकार कठोर कारवाईची घोषणा करते; परंतु घोटाळे उघडकीस येण्यापूर्वी प्रतिबंधात्मक यंत्रणा प्रभावी का ठरत नाही, याचे उत्तर मात्र मिळत नाही.



या प्रकरणात न्यायालयाने जामीन नाकारल्याने तपास अधिक सखोल होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, केवळ आरोपींना तुरुंगात ठेवणे म्हणजे ठेवीदारांना न्याय मिळाला, असे होत नाही. त्यांची अडकलेली रक्कम कधी आणि कशी परत मिळणार, याबाबत स्पष्ट आराखडा आवश्यक आहे.

यामुळे काही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत

✻ सहकार विभागाच्या नियमित तपासणीत अनियमितता आधीच का समोर आली नाही?

✻ आर्थिक व्यवहारांवर देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का?

✻ ठेवीदारांचे हित जपण्यासाठी सरकारकडे प्रभावी आणि वेळेवर हस्तक्षेप करणारी यंत्रणा आहे का?

✻ प्रत्येक घोटाळ्यानंतर चौकशी समित्या आणि गुन्हे दाखल होतात; पण भविष्यात असे प्रकार रोखण्यासाठी कोणती ठोस सुधारणा करण्यात आली आहे?

आर्थिक गुन्ह्यांमध्ये केवळ आरोपींवर कारवाई करून प्रश्न संपत नाही. प्रशासकीय निष्काळजीपणा, नियामक यंत्रणांची कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांचीही तितकीच कठोर चौकशी होणे आवश्यक आहे.

न्यायालयाचा निर्णय हा कायदेशीर प्रक्रियेचा भाग असला, तरी ठेवीदारांसाठी खरा न्याय तेव्हाच मिळेल, जेव्हा त्यांची आयुष्यभराची कमाई सुरक्षित परत मिळेल आणि अशा घोटाळ्यांना वेळेत आळा घालणारी व्यवस्था सरकार प्रत्यक्षात उभी करेल.

# बंगालच्या उपसागरात मानवतेचा सामूहिक बळी! ५०० हून अधिक रोहिंग्या बेपत्ता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

म्यानमार । वृत्तसंस्था

बंगालच्या उपसागरातून पुन्हा एकदा मानवतेला हादरवणारी दुर्घटना समोर आली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या णछक्रुठ आणि खजच् या संस्थांच्या माहितीनुसार, म्यानमारमधील छळग्रस्त रोहिंग्या अल्पसंख्याकांना घेऊन निघालेल्या दोन बोटी समुद्रात उलटल्याची भीती असून ५०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला असावा, अशी गंभीर शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अधिकृत पडताळणी अद्याप सुरू असली तरी ही अलीकडच्या काळातील सर्वात भीषण निर्वासित दुर्घटनांपैकी एक ठरू शकते.

प्राथमिक माहितीनुसार, या बोटी जूनच्या अखेरीस म्यानमारच्या रखाइन राज्यातून निघाल्या होत्या. त्यामध्ये बहुतांश रोहिंग्या निर्वासित होते, तर काही जण बांगलादेशातील कॉक्स बाजार निर्वासित छावण्यांतून आले होते. एका बोटीवरील सुमारे २५० प्रवाशांशी संपर्क तुटला, तर सुमारे २८० प्रवासी असलेली दुसरी बोट ८ जुलै रोजी म्यानमारच्या किनाऱ्याजवळ बुडाल्याची भीती आहे.

संयुक्त राष्ट्रांनी या घटनेबाबत तीव्र चिंता व्यक्त करत सांगितले की, युद्ध, धार्मिक छळ, नागरिकत्वाचा अभाव आणि मदतीतील कपात यामुळे हजारो रोहिंग्या आजही जीव धोक्यात घालून समुद्रमार्गे पलायन करण्यास भाग पडत आहेत. मानवी हक्क संघटनांनी या दुर्घटनेला केवळ नैसर्गिक आपत्ती नव्हे, तर जागतिक समुदायाच्या अपुऱ्या हस्तक्षेपाचे आणि दीर्घकाळ चाललेल्या मानवी संकटाकडे झालेल्या दुर्लक्षाचे परिणाम असल्याचे म्हटले आहे.

# कावेरी कर्नाटकची मालमत्ता नाही : मेकदातू प्रकल्पाविरोधात जलसंघर्ष पुन्हा पेटला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मदुराई। वृत्तसंस्था

कावेरी नदीच्या पाणीवाटपाच्या वादाने पुन्हा एकदा तीव्र स्वरूप धारण केले आहे. कर्नाटक सरकारच्या प्रस्तावित मेकदातू धरण प्रकल्पाविरोधात तामिळनाडूमधील शेकडो शेतकरी राज्याच्या सीमेकडे मोर्चा काढत आंदोलनाला उतरले. आंदोलकांनी स्पष्ट इशारा दिला की, कावेरी ही कर्नाटकला हवे तेव्हा पाणी सोडण्यासाठी किंवा रोखण्यासाठी वापरण्याची वाहिनी नाही; ही दोन्ही राज्यांची जीवनवाहिनी आहे.

शेतकरी संघटनांचा आरोप आहे की मेकदातू प्रकल्पामुळे कर्नाटकला पाण्याचा अधिक साठा करण्याची क्षमता मिळेल, ज्यामुळे तामिळनाडूला शेतीसाठी आवश्यक असलेला कावेरीचा प्रवाह कमी होऊ शकतो. यामुळे लाखो शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर आणि डेल्टा प्रदेशातील कृषी अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

दुसरीकडे, कर्नाटक सरकारचा दावा आहे की हा प्रकल्प मुख्यतः बंगळुरूच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि पूरनियंत्रणासाठी आवश्यक आहे. मात्र तामिळनाडूतील शेतकरी संघटना आणि विरोधी पक्षांचा आरोप आहे की पाणीटंचाईच्या नावाखाली नदीच्या प्रवाहावर नियंत्रण मिळवण्याचा हा प्रयत्न असून, यामुळे सर्वोच्च न्यायालय आणि कावेरी जलव्यवस्थापन प्राधिकरणाच्या आदेशांच्या भावनेलाच धक्का बसू शकतो.

कावेरीवरील हा संघर्ष पुन्हा एकदा दक्षिण भारतातील जलराजकारण तापवण्याची चिन्हे दिसत असून, केंद्र सरकारने या संवेदनशील प्रश्नावर तातडीने हस्तक्षेप करून दोन्ही राज्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.

# जगाचा कल अमेरिकेकडून चीनकडे? प्यू रिसर्चचा मोठा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : अमेरिकेतील स्वतंत्र संशोधन संस्था प्यू रिसर्च सेंटर यांच्या ताज्या जागतिक सर्वेक्षणानुसार, गेल्या सुमारे २० वर्षांच्या इतिहासात प्रथमच जगातील अनेक देशांमध्ये अमेरिकेपेक्षा चीनबद्दल अधिक सकारात्मक मत व्यक्त करण्यात आले आहे. ३६ देशांतील ४२ हजारांहून अधिक नागरिकांवर करण्यात आलेल्या या सर्वेक्षणात २५ देशांमध्ये चीनला अमेरिकेपेक्षा अधिक अनुकूल प्रतिसाद मिळाल्याचे समोर आले. मात्र भारत हा अजूनही त्या मोजक्या देशांपैकी एक आहे, जिथे अमेरिकेबद्दलचा दृष्टिकोन चीनपेक्षा अधिक सकारात्मक असल्याचे सर्वेक्षणात दिसते.

भारतासाठी या बदलाचे महत्त्व मोठे मानले जात आहे. एकीकडे भारताचा चीनसोबत सीमावाद आणि हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रातील धोरणात्मक स्पर्धा कायम आहे, तर दुसरीकडे अमेरिका हा भारताचा महत्त्वाचा संरक्षण, तंत्रज्ञान आणि गुंतवणूक भागीदार आहे. अशा परिस्थितीत जागतिक जनमत चीनच्या बाजूने झुकत असल्यास भारताला स्वतंत्र आणि संतुलित परराष्ट्र धोरण कायम ठेवत दोन्ही महासत्तांशी समान संबंध राखण्याचे आव्हान अधिक कठीण होऊ शकते.

भारत सरकारने या सर्वेक्षणावर अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र भारताची अधिकृत भूमिका सातत्याने अशी राहिली आहे की भारत कोणत्याही एका महासत्तेच्या गटात न जाता भारत प्रथम या तत्त्वावर, बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था आणि राष्ट्रीय हितांवर आधारित स्वतंत्र परराष्ट्र धोरणाचा अवलंब करतो. त्याचवेळी चीनबरोबर सीमा सुरक्षेवर कठोर भूमिका आणि अमेरिकेसोबत संरक्षण, तंत्रज्ञान व आर्थिक सहकार्य वाढवण्याचे धोरण कायम ठेवले आहे.

प्यू रिसर्च सेंटर ही अमेरिकेतील एक स्वतंत्र, राजकीय पक्षनिरपेक्ष संशोधन संस्था म्हणून ओळखली जाते. ही संस्था जगभरातील जनमत, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषयांवरील सर्वेक्षणे प्रकाशित करते. तिचे निष्कर्ष धोरणकर्ते, संशोधक आणि माध्यमांकडून मोठ्या प्रमाणावर उद्धृत केले जातात.

मात्र, कोणत्याही जनमत सर्वेक्षणाप्रमाणेच हे निष्कर्ष त्या वेळच्या लोकांच्या मतांवर आधारित असतात; ते कोणत्याही सरकारच्या धोरणाचे किंवा वस्तुस्थितीचे अंतिम प्रमाण मानले जात नाहीत.

# १२ वर्षे आश्वासनेच आता घरकुलवासीयांचा संताप रस्त्यावर; महापालिकेवर जनआक्रोश मोर्चा

## पाणी, सांडपाणी, भाजी मंडई, सुरक्षा, शैक्षणिक सुविधा यांसह मूलभूत प्रश्नांवर नागरिकांचा एल्गार; ‘यावेळीही आश्वासनेच मिळाली तर तीव्र आंदोलन’

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

चिखलीतील घरकुल परिसरातील मूलभूत नागरी सुविधांच्या प्रश्नांवर गेल्या १२ वर्षांपासून ठोस तोडगा न निघाल्याने अखेर नागरिकांचा संताप रस्त्यावर उतरला. महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि भाजी मंडई धारकांनी गुरुवारी पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त कार्यालयावर भव्य जनआक्रोश मोर्चा काढत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

मोर्चाचे नेतृत्व मारुती गणपत जाधव यांनी केले. आंदोलनकर्त्यांनी महापालिका प्रशासनाला सविस्तर निवेदन देत घरकुल परिसरातील रखडलेल्या विकासकामांसाठी निश्चित कालमर्यादेत कृती आराखडा जाहीर करण्याची मागणी केली.

नागरिकांनी मांडलेल्या मागण्यांमध्ये एसटीपीचे दूषित पाणी घरकुल परिसरात येणे तातडीने थांबविणे, अनेक वर्षांपासून बंद असलेली भाजी मंडई सुरू करणे, अपूर्ण सांस्कृतिक भवन नागरिकांसाठी खुले करणे, व्यायामशाळा व अंगणवाडी सुरू करणे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्टॉर्म वॉटर लाईनची नियमित स्वच्छता, मुख्य प्रवेशद्वारावर कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमणे आणि घरकुल परिसरासाठी स्वतंत्र विकास कृती आराखडा जाहीर करणे अशा प्रमुख मागण्यांचा समावेश होता.

मोर्चात काँग्रेसचे नेते सोमनाथ शेळके, सुग्रीव पाटील, सुरेश वैरागर, रमेश शिंदे, संजय तळेकरी, सूरज देशमाने, दत्तात्रय डोके, तानाजी हावळे, संदीप रोकडे, दीपक कांबळे, सुधाकर कदम, संग्राम पवार, नानासाहेब वाघमारे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

विशेष म्हणजे, याच दिवशी महापौर रवी लांडगे यांनी घरकुल परिसराची पाहणी करून पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजनांचे निर्देश दिले, तर दुसरीकडे नागरिकांनी महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यामुळे प्रशासनाच्या दाव्यांमध्ये आणि नागरिकांच्या अनुभवामध्ये मोठी दरी असल्याचे चित्र समोर आले आहे.

आता काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत

✻ जर हे प्रश्न १२ वर्षांपासून प्रलंबित आहेत, तर जबाबदार कोण?

✻ प्रत्येक पावसाळ्यानंतर पाहण्या आणि बैठका होतात, पण कायमस्वरूपी उपाय का होत नाहीत?

✻ घरकुल परिसरासाठी स्वतंत्र विकास आराखडा आजपर्यंत का तयार झाला नाही?

✻ महापालिका यावेळी निश्चित कालमर्यादेसह कामे पूर्ण करणार का?

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यावेळीही केवळ आश्वासने मिळाली आणि प्रत्यक्ष काम सुरू झाले नाही, तर यापेक्षाही व्यापक आणि तीव्र लोकशाही आंदोलन उभारले जाईल. त्यामुळे घरकुल परिसरातील नागरिकांच्या संयमाचा अंत झाला असून, आता त्यांच्या अपेक्षा केवळ घोषणांवर नव्हे तर प्रत्यक्ष विकासकामांवर केंद्रित झाल्या आहेत. .

# शिरूर नगरपरिषदेतील ठेका सफाई कामगारांचा किमान वेतनाचा प्रश्न ऐरणीवर; राज्यमंत्री दर्जा लाभलेले गणेश ताठे यांची उपोषणस्थळी भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर नगरपरिषदेतील ठेका पद्धतीवरील सफाई कामगारांना किमान वेतन मिळत नसल्याच्या आरोपावरून सुरू असलेल्या आंदोलनाने आता राज्यस्तराचे लक्ष वेधले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या किमान वेतन आयोग सल्लागार समितीचे अध्यक्ष तथा राज्यमंत्री दर्जा लाभलेले गणेश ताठे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्ते महिबूब सय्यद यांच्याशी चर्चा केली.

यावेळी उपोषणकर्त्यांनी ठेका सफाई कामगारांना शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार वेतन देण्यात यावे, तसेच कामगारांचे श्रमकायद्यानुसार सर्व हक्क सुनिश्चित करावेत, अशी मागणी केली. गणेश ताठे यांनी आंदोलनकर्त्यांचे म्हणणे ऐकून संबंधित प्रशासनाशी चर्चा करून योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

मात्र या प्रकरणामुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. किमान वेतन कायदा अस्तित्वात असतानाही नगरपरिषदेच्या ठेका कामगारांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळत नसेल, तर त्याची जबाबदारी कोणाची? ठेकेदार, नगरपरिषद आणि कामगार विभाग यांनी नियमित तपासणी करूनही ही परिस्थिती का बदलली नाही?



कामगार संघटनांच्या मते, अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ठेका पद्धतीवरील कर्मचाऱ्यांना किमान वेतन, ईपीएफ, ईएसआय आणि इतर वैधानिक लाभांपासून वंचित ठेवले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. त्यामुळे केवळ भेटी आणि आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष वेतनवाढ, थकबाकीची भरपाई आणि कायद्याची अंमलबजावणी महत्त्वाची असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

आता गणेश ताठे यांच्या भेटीनंतर प्रशासनाकडून ठोस निर्णय होतो की हा प्रश्न पुन्हा आश्वासनांपुरताच मर्यादित राहतो, याकडे शिरूरमधील सफाई कामगारांचे लक्ष लागले आहे.

# युद्धाच्या छायेत युक्रेनमध्ये राजकीय भूकंप! पंतप्रधान बदलले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

वॉशिंग्टन/तेहरान । वृत्तसंस्था

रशियाविरुद्धचे युद्ध सुरू असतानाच युक्रेनमध्ये मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. युक्रेनच्या संसदेने २८९ मतांच्या बहुमताने ऊर्जा क्षेत्रातील अधिकारी सेरही कोरेत्स्की यांची नव्या पंतप्रधानपदी नियुक्ती केली. संरक्षण बळकट करणे, अर्थव्यवस्था स्थिर ठेवणे आणि युरोपियन युनियनमध्ये प्रवेशाची प्रक्रिया वेगवान करणे ही त्यांची प्रमुख उद्दिष्टे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

मात्र या नियुक्तीवर राजकीय वाद निर्माण झाला नसला, तरी राष्ट्राध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की यांनी लोकप्रिय संरक्षणमंत्री मिखायलो फेडोरोव्ह यांना पदावरून हटवल्याने राजधानी कीवसह अनेक शहरांत नागरिकांनी निदर्शने केली. आंदोलकांनी हा निर्णय युद्धकाळात संरक्षण व्यवस्थेला धक्का देणारा असल्याचा आरोप केला आणि फेडोरोव्ह यांना पुन्हा पदावर नेमण्याची मागणी केली. युद्धाच्या काळात आतापर्यंत राष्ट्रीय ऐक्य टिकवून ठेवणाऱ्या झेलेन्स्की सरकारसमोर आता अंतर्गत असंतोषाचे आव्हान उभे राहिले आहे. विरोधकांचा आरोप आहे की हा मंत्रिमंडळ फेरबदल कार्यक्षमतेपेक्षा सत्तेवरील नियंत्रण मजबूत करण्यासाठी करण्यात आला, तर सरकारचे म्हणणे आहे की आगामी हिवाळा, युद्ध आणि ऊर्जा संकट लक्षात घेऊन प्रशासनात बदल आवश्यक होते.